# प्रकरण पाचवे

# समारोप

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

प्रवासवर्णन हा ललितवाड्.मय प्रकार साहित्याच्या क्षेत्रात आज लोकप्रिय होत असल्याचे दिसून येते. प्रवास करणे हा माणसाचा गुणधर्म आहे. सुर्यमालेचा विचार केला तर प्रत्येक ग्रह हे फिरताना दिसतात. ते स्थिर राहूच शकत नाहीत. तसेच पृथ्वीचे असून पृथ्वीवरील प्राणीमात्रांचे आहे. मग मानव तरी त्या निसर्गनियमास अपवाद कसा. पृथ्वीवरील मानव प्राणी वेगवेगळ्या कारणांनी प्रवास करतो. प्रवास म्हणजे सतत घडणारी प्रक्रिया आहे. मानवाच्या आदिम अवस्थेपासून ते आजपर्यंत प्रवास हा सुरूच आहे. प्रवास बरेचजण वेगवेगळ्या कारणांनी करतात, पण सर्वचजण काही केलेल्या प्रवासाची नोंद करून ठेवत नाहीत. केलेला प्रवास हा फक्त स्मृतिपटलावर काही काळ जसाच्या तसा राहतो. काही कालावधी लोटल्यानंतर प्रवासातील आठवणी पुसून जातात, अंधुक होऊ लागतात. काहीजण विशिष्ट हेतूने प्रवास करतात. साहित्य क्षेत्रातील लेखक वा ज्यांना प्रतिभेची देणगी, कलात्मकता हे गुण आहेत अशांनी केलेला प्रवास, प्रवासपूर्ण केल्यानंतर लेखनरूपाने प्रकाशित केला जातो. तोच समाजमाणसात लेखनरूपाने प्रवासातील वास्तव अनुभवासह कलात्मक पातळीवर प्रकाशित केला जातो.

आपल्या मराठी भाषेमध्ये प्राचीन काळापासून प्रवास लेखनाचे कार्य सुरू आहे. नारो बहाळियेच्या ऋध्दिपूर वर्णनापासून मराठीत प्रवासवर्णन मिळतात. नामदेवादिकांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने केलेली तीर्थावळी, पानीपतहून परतलेल्या

माणसांनी केलेली प्रवासवर्णने म्हणजे पुष्कळदा माहितीपर ग्रंथ असत, १९२५–२६ च्या दरम्यान वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके यांनी इंग्रजीतील Personal essay या वाङ्.मय प्रकारावरून मराठीत ललितनिबंध हा आत्मनिष्ठ निबंध प्रकार रूढ केला. या वाङ्.मय प्रकाराची तात्विक चर्चाही केली. ना. सी. फडके यांनी त्याला हितगुज, गुजगोष्टी असे नाव दिले, तर वि. स. खांडेकर यांनी लघुनिबंध असे नाव दिले. हा वाङ्.मय प्रकार मराठीत कसा व कोठून आला याचेही विवेचन प्रवासवर्णनाचा उगम या घटकात केले आहे. या लघुप्रबंधासाठी सौ. उषा पाणंदीकर यांच्या 'आज इथे उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' या दोन प्रवासवर्णनांचा सहभाग केला आहे. अभ्यासाच्या सोयीनुसार पाच प्रकरणात विभागणी केली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये प्रवासवर्णनांचा उगम कुठून व कसा झाला याचे विवेचन केले असून प्रवासाची प्रथमावस्था कशी होती, प्राचीन कालखंडात मराठी भाषेत प्रवासवर्णने लिहिण्यास कोणी सुरूवात केली याचेही विवेचन केले आहे. मराठीमध्ये खऱ्या अर्थाने प्रवासवर्णनाची सुरूवात कोणाच्या प्रवासवर्णनाने होते हे ही सांगितले आहे. प्रवासवर्णन वाङ्.मयाचे स्वरूप सांगत असताना, मराठीच्या साहित्यक्षेत्रात प्रवासवर्णन लिहून ज्यांनी नावलौकिक मिळविला त्या लेखकांच्या मतांचा या प्रकरणात स्वरूप विवेचनासाठी आधार घेतला. याच प्रकरणात प्रवासवर्णन वाङ्.मय प्रकाराचा अर्थही दिलेला असून, संस्कृत शब्दातून प्रवास हा शब्द कसा निर्माण झाला त्याची उत्पत्तीही दिली असून त्याचाही अर्थ दिला आहे. इंग्रजी शब्दकोषातही प्रवासवर्णनासाठी कोणता शब्द आहे तो दिला असून त्याचेही विश्लेषण केले आहे. तसेच मराठीतील ज्यांनी प्रवासवर्णनावर पी. एच.

डी. मिळवली त्यांच्या प्रवासवर्णनावरील व्याख्येचा तसेच इतरांच्या व्याख्यांचा अंतर्भाव केला आहे. ह्या जाणकारांच्या व्याख्यांतूनही प्रवासवर्णनाचे स्वरूप व विशेष दिसून येतात. प्रवास हा कोणत्या हेतुने केला जातो?त्याच्यामागील कारणे काय? प्रवासाच्या प्रेरणा कोणत्या?याचाही उल्लेख केला आहे. यामध्ये प्राचीन कवी मोरोपंतांचा उल्लेख असून, याच विषयावर डॉक्टरेट मिळविलेले वसंत सावंत तसेच पु. ल. देशपांडे यांच्याही सांगितलेल्या कारणांचा उल्लेख केला आहे. प्रवासवर्णनासाठी वाङ्.मयाचे महत्त्वाचे घटक कोणते हे डॉ. वसंत सावंत यांच्या मताचाही समावेश केला आहे. प्रवासवर्णन लेखनाची तयारी व काही गुणधर्म डॉ. आनंद पाटील यांच्या विवेचनावरून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. प्रवासवर्णनाचे तंत्र कसे असावे, तसेच प्रवासवर्णनाच्या सजावटीची साधणे फोटो व रेखाचित्रे यामुळे प्रवासवर्णन लेखनात वास्तवता व नाट्यमयता कशी येते याचेही विवेचन केले आहे. प्रवासवर्णन हे आत्मनिष्ठ स्वरूपाचे असते. प्रवासवर्णनात लेखकाच्या आत्मनिवेदनालाही महत्त्व असते. प्रवासवर्णनात जो 'मी' व्यक्त झालेला असतो तो दोन पातळीवरचा असतो. याचेही विवेचन या प्रकरणात केले आहे. प्रकरण दुसऱ्यामध्ये लेखिकेच्या लेखनाच्या प्रेरणा व स्वरूप हे अभ्यासाला नेमलेल्या पुस्तकावरून सांगितले आहे. सौ. उषा पाणंदीकर प्रवास लेखन करत असताना आपल्या दोन्ही पुस्तकांमध्ये त्यांनी लेखनाच्या प्रेरणांचा उल्लेख वेळोवेळी केलेला आहे. लेखिकेच्या लेखनामागील प्रेरणा दोन्ही पुस्तकाच्या आधारे सांगितल्या असून, दोन्ही पुस्तकाचे स्वरूप साहित्यक्षेत्रात कोणत्या पातळीवर उतरले आहे, हे साहित्यसमीक्षेतील जाणकारांच्या मतांच्या साह्याने

सांगितले आहे.

प्रकरण तिसरे हे वाड्.मयीन मुल्यमापन असून, यामध्ये प्रवासवर्णन वाड्.मयातील वेगवेगळ्या घटकावर लक्ष केंद्रित केले आहे. लेखिकेने प्रवासवर्णनामध्ये कोणत्या घटकांचा अवलंब केला आहे? कितपत केला आहे? कोणत्या पातळीवर केला आहे ? याचा ऊहापोह या प्रकरणात केला असून यामध्ये, रचनाविशेष, निसर्गचित्रण, व्यक्तिचित्रण, निवेदनशैली, शिर्षकाची समर्पकता, छायाचित्रे, भाषाविशेष यामध्ये पुन्हा म्हणी, मराठी म्हणी, कोकणी म्हणी, संस्कृत म्हणी, पोर्तूगीज म्हणी, हिंदी म्हणी तसेच हिंदी शब्दांचा वापर, संस्कृत शब्दांचा वापर, इंग्रजी शब्दांचा वापर, कोकणी शब्दांचा वापर, हिंदी गीतांचा वापर, संवाद, काव्यमयता, उपमा या वाड्.मयीन घटकांच्या आधारे वरील दोन्ही पुस्तकांचे वाड्.मयीन मुल्यमापन केले आहे. प्रकरण चौथ्यामध्ये प्रवासवर्णनाचे विशेष सांगितले आहेत. यामध्ये आख्यायिका, दंतकथा, शिल्पवर्णन/वास्तूवर्णन, स्थलवर्णन, शहरांचे विशेष, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, समजूती, सण, उत्सव, जीवनभाष्य, लेखकाची निरीक्षणशक्ती, आत्मपरीक्षण, प्रगल्भता, लेखकाचे व्यक्तिमत्त्व या घटकांच्या आधारे या दोन्ही पुस्तकांचे विशेष सांगितले आहेत. पाचवे प्रकरण समारोपाचे आहे अशा प्रकारे पाच प्रकरणात या लघुप्रबांधाची मांडणी आहे.

एक स्त्री लेखिका म्हणून जेव्हा आपण उषा पाणंदीकर यांचेकडे पाहतो तेव्हा त्यांचा सर्वांनाच हेवा व कौतुक वाटते. प्रवास करणे ही प्रक्रिया काही सोपी नाही. दूरच्या प्रवासाला जाऊन माघारी परत कोणीही येऊ शकतो. पण लेखक जेव्हा प्रवासाला निघतो

तेंव्हापासून ते प्रवासाहून आल्यापर्यंतचे सर्व अनुभवविश्व आपल्या लेखनीव्दारे लेखक आपल्या स्मृतीच्या आधारे, नोंदवही,रेकॉर्डर, कॅमेरा, छायाचित्रांच्या आधारे कलात्मकरित्या वर्णन करीत असतो. पुर्वीची जी प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत ती विशिष्ट हेतू ठेवून लिहिली आहेत. तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन पुण्यपदरात पाडणे हाच विशेष हेतू दिसून येतो. पण पाणंदीकर यांच्या दोन्ही प्रवासवर्णनांचा विचार केला तर त्यांनी जास्तीत जास्त तिर्थस्थळांनाच भेटी दिल्याचे सत्य उघडकीस येते. भेटी देण्यामागे पुण्यपदरात पाडणे हा हेतू जरी नसला.

सौ. उषा पाणंदीकर यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ जरी असले तरी कधी कधी अतिशय भडक विधाने करताना दिसतात. प्रवासवर्णन करताना त्यांनी आपल्या दोन्ही पुस्तकात मिश्रभाषेचा वापर केला आहे. कोकणी भाषेतील शब्द, वाक्य समजण्यास अडथळा वाटतो. तर दोन्ही प्रवासवर्णन पुस्तकात जास्तीत जास्त तीर्थक्षेत्रांनाच त्यांनी भेटी देऊन त्याचे वर्णन सुक्ष्म केले आहे. तसेच या प्रवासात जाताना जी निसर्गस्थळे, तीर्थक्षेत्राजवळील परिसर याचेच बारकाईने वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. जेव्हा त्या एखाद्या तीर्थक्षेत्राला भेट देतात तेव्हा त्या तेथील वास्तववदर्शी चित्रण करतात. एखाद्या तीर्थस्थळाचे, ऐतिहासिक वास्तूचे महत्त्व काय आहे. त्याच्या उभारणीमागे कोणता इतिहास दडला आहे. याचाही त्यांनी ऐतिहासिक पातळीवर सुंदररित्या उल्लेख केला आहे. लेखिका जेव्हा एखाद्या ठिकाणाचे ऐतिहासिक वर्णन करतात तेव्हा तटस्थपणा स्वीकारूनच वर्णन करतात. त्या परखडपणे, कुणाचाही मुलाहिजा न ठेवता वास्तव आणि खरे सत्य याचा पाडा

वाचतात.

स्त्री लेखिका म्हणूनही त्या मनाने व शरीरानेही मजबूत आहेत. जसे त्या वास्तवचित्रण करण्याला घाबरत नाहीत. तशाच त्या भौगोलिकदृष्ट्या भिन्न प्रदेशात, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असला तरी त्या प्रवासाला मागे हटत नाहीत. प्रवासात त्यांनी आपल्या गोमंतकीय स्वभावाला, आवडीनिवडी, खानपान याकडे पुर्णत: हेतूत: लक्षात घेऊनही दुर्लक्ष केले आहे. त्यांनी प्रवासात मिळेल त्या ठिकाणी राहून व मिळेल तसे जेवण करून हा प्रवास पूर्णत्वास आणला आहे. एक स्त्री म्हणून एक गृहिणी म्हणून त्यांना अनेक अडचणी जरी असल्या तरी त्यांनी हा प्रवास जिज्ञासूवृत्तीने केल्याचे दिसून येते. 'साहित्य हे नीतिवादी व जीवनोपयोगी असले पाहिजे तरच त्याचा स्वीकार करता येईल असे प्लेटो म्हणतो हे योग्यच आहे. उषा पाणंदीकरांच्या दोन्ही पुस्तकांत वरील दोन्ही घटक असल्याचे आपल्या निदर्शनास येते. साहित्याचा जीवनाशी संबंध असतो. त्याची निर्मिती एका उत्कट अशा मनस्थितीत होते आणि साहित्याचा प्रभाव वाचकावर मोठाच होतो. हे प्लेटोनेसुध्दा मान्य केले आहे. लेखिका जेव्हा एखादी घटना पाहतात तेव्हा त्या फारच भावविवश होतात. हृदयाला पिळ पाडल्याप्रमाणे त्या आपल्या भावना लेखनीतून उतरवतात तर कधी एखाद्या लहान निरागस बालकाप्रमाणे अवखळपणे प्रवासवर्णनाला गती देतात, तर कधी निसर्गाच्या इतक्या प्रेमात पडतात की त्या निसर्गस्थळाशी एकरूप होऊन जातात. नकळतच त्यांच्या पोटातील शब्द ओठात येतात. अन् मग त्यांच्यातील कवियित्री जागी होऊन काव्याच्या ओळी त्यांच्या लेखनीतून आपोआपच पाझरू लागतात.

विख्यात टीकाकार लाँजायनसने 'On the sublime' हा त्यांचा अपूर्ण अवस्थेतील ग्रंथ उपलब्ध आहे या ग्रंथात लाँजायनसने वाङ्.मयीन महात्मतेची चर्चा केली आहे. ''काव्यनिर्मिती ही एक प्रकारच्या धुंदीत होते व कवी वाचकांना आपल्या नादी लावतो, हे प्लेटोचे विधान होते व कवी वाचकांना आपल्या नादी लावतो, हे प्लेटोचे विधान त्याला मान्य होते. फरक इतकाच, लाँजायनसच्या मते धुंद आणि उत्कट अशा मन:स्थितीत कवी असला तरच त्याच्या हातून उच्च दर्जाची काव्यनिर्मिती होते. असा कवी वाचकांच्या भावनांना स्पर्श करतो. त्यामुळे वाचक एका वेगळ्याच सृष्टीत रममाण होतात. असा परिणाम ते काव्य घडवून आणील त्यातच वाङ्.मयीन महात्मता असते, असा निर्वाळा लाँजायनसने दिला आहे. सौ. उषा पाणंदीकर यांचेही लेखन वाचकांच्या भावनांना स्पर्श करते, आपल्या नादी लावून वाचक वेगळ्याच सृष्टीत रममाण होतो हे त्याच्या दोन्ही पुस्तकांचे विशेष म्हणून आपल्याला त्यांचा उल्लेख करावा लागेल.

'क्रिटिक ऑफ जजमेंट' या ग्रंथामध्ये ''कलाकृती ही स्वतंत्र असते, नीती, उपयुक्तता यासारख्या निकषांना कलेमध्ये स्थान असत नाही; इंद्रियजन्य आनंदापेक्षा सर्वस्वी निराळा कलानंद अलौकीकही असतो व निरपेक्षही असतो; दृश्य जगाची प्रचीती इंद्रियांच्याव्दारे येते हे खरे पण कल्पनाशक्तीच्या प्रभावामुळे जो अनुभव कवीला येतो तो इंद्रियांच्या पलिकडचा असतो; तसेच तो स्वसंवेद्य असतो; कलावंताला आलेल्या अवर्णनीय अनुभवामुळेच कलाकृती जन्म घेते; आपल्या कल्पनेतल्या विश्वाला कलावंत जे मुर्त रूप देतो ते आपल्याला परिचित असलेल्या सृष्टीसारखे दिसते; त्यामुळेच सत्याचा

फक्त अभासच निर्माण करते; कलावंताला स्फुरलेले विचार आणि त्याचे अनुभव हे तसे वैयक्तिक असले तरी ते सर्वांना आकलन होतील अशा पध्दतीने मांडले गेल्यामुळे त्याची निर्मिती ही सर्वस्पर्शी ठरते.

उषा पाणंदीकरांनी आपले लेखन हे वास्तवाच्या पातळीवर केले असून प्रत्यक्ष त्यांनी जो प्रदेश प्रवासात पाहिला त्याचे त्यांनी कलात्मक व प्रतिभाशक्तीच्या साह्याने सुंदर व नेमक्या शब्दात वर्णन केले आहे. एका उत्तम साहित्यिकात ज्या गुणांची मिश्रण असायला हवी ते सर्वच गुण पाणंदीकरांच्या व्यक्तित्वात असल्याचे त्यांच्या लेखनीमुळे समजून येते. 'फिलॉसॉफी ऑफ फाइन आर्टस्.' या ग्रंथात हेगेलची कला निर्मितीबद्दलची मते प्रकट झाली आहेत. ''माणसाला भोवतालच्या भौतिक सृष्टीतून संवेदनांच्याव्दारे एक अनुभूती होत असते. त्याबरोबरच त्यांच्या अंगी असलेली प्रतिभा त्याला निराळ्या प्रकारचा अनुभव देत असते. अशा दुहेरी अनुभवांच्या परस्पर – प्रक्रियेतून त्याची कल्पनासृष्टी उदयास येते''. उषा पाणंदीकरांचेही कल्पनाविश्व वाखाण्याजोगे आहे. त्यांच्या उपमा, प्रतिमा यांनाखरोखरच तोड नाही. त्यांनीही त्याचा आपल्या दोन्ही प्रवासवर्णनात पुरेपूर वापर केल्याचे दिसून येते.

श्लेगेल हा जर्मन तत्वज्ञ ''शेलिंगच्या मते अंत: प्रेरणेने कलावंताला जो दिव्यत्वाचा साक्षात्कार होतो, ते खरे सौंदर्य होय. या सौंदर्याला मूर्त स्वरूप देण्यातच त्याची खरी कला दिसून येते. श्लेगेलच्या मते मूर्त स्वरूपातील कलाकृती ही खुणेसारखी दिसते. कलावंत प्रतिमांच्याद्वारा आपल्याला विश्वाचे ज्ञान करून देत असतो.'' उषा पाणंदीकरांनीही अशा उपमा, प्रतिमांचेही विश्व उभे करून त्याचा त्यांनी आपल्या पुस्तकात

प्रत्यय आणून दिला आहे.

हिपोलिन तेन या फ्रेंच समीक्षकाने ऐतिहासिक समीक्षापध्दतीवर विशेष भर दिला त्याच्या मते ''ज्या वातावरणात मणुष्य वाढतो त्यानुसार त्याच्या विचारांना वळण लागते. म्हणूनच साहित्य कृतीनुसार विचार करताना लेखक कोणत्या काळात जन्मला, तत्कालीन सामाजिक स्थिती काय होती इत्यादी गोष्टी विचारात घेणे अगत्याचे ठरते.'' वरील मताचा विचार केला तर लेखिकेच्याहि घरात लेखनाची तशी परंपरा असल्याचे दिसून येते. त्यांनी त्यांच्याच घरी लेखनाची पुर्वपरंपरा पुढे चालविल्याचे दिसून येते. त्यामुळेच तर त्यांच्या हातून अशा सुंदर कलाकृत्या निर्माण झाल्या आहेत असे म्हणावेसे वाटते.

लिओ टॉलस्टॉय हा महान रशियन लेखक त्याची कलाविषयक मते 'What is Art' या ग्रंथात व्यक्त झाली आहेत. 'कलेला धार्मिक व नैतिक अधिष्ठान असावे, केवळ उच्चभ्रू लोकांचे मनोरंजन हे कलेचे उद्दिष्ट न मानता बहुजनसमाजाला सुबुध्द व सुसंस्कृत करणे हे कलावंतांनी आपले कार्य मानावे; अशी टॉलस्टॉयची कलेकडे पाहण्याची भूमिका आहे. वरील टॉलस्टॉयच्या मताची पुरेपूर जाणीव असल्याप्रमाणे त्याच्या मताशी तंतोतंत मिळतेजुळते अशी दोन्ही प्रवासवर्णने लेखिकेच्याव्दारे पुर्णत्वास पात्र झाली आहेत यात तिळमात्र शंका नाही.

मॅथ्यू ॲरनॉल्ड हा इंग्लंडमधील टीकाकार ''प्रतिभावंत लेखक हा जरी जीवनाचा भाष्यकार असला तरी त्याचे काव्य नैतिक मूल्यांची अवहेलना करणारे असेल तर त्याने जीवनाकडे पाठ फिरविली असेच होईल. असा इशारा ॲरनॉल्डने दिला आहे. उषा पाणंदीकर या जेव्हा जेव्हा समाजचित्रण वास्तव पातळीवर करतात, समाजातील चालीरिती

रूढी, परंपरा यांचे चित्रण करतात तेव्हा त्या सामाजिक भान विसरत नाहीत किंवा एखाद्या समाजाची नैतिक मूल्यांची अवहेलना न होईल याकडे पुर्ण लक्ष देऊनच आपले लेखन पुर्ण करताना दिसतात. वास्तवातील जीवन आणि सुखाची लालसा ह्यांच्या संघर्षातूनच कलानिर्मिती होत असते. ह्या दोन्हींचा सुंदर असा सुमेळ घालण्याचा प्रयत्न उषा पाणंदीकरांनी केला आहे. ''प्रत्यक्ष जीवनात असाध्य आशा–आकांक्षांची व इच्छांची तृप्ती कलावंत कलेच्या द्वारा करत असतो.'' हा सिग्मंड फ्रॉईडचा कलानिर्मितीकडे पाहण्याचा दृष्टीकोन आहे. हा दृष्टीकोन प्रवासवर्णनाच्या बाबतीत थोडासा दुबळा पडल्यासारखा वाटतो. कारण लेखकाला जो प्रदेश भावतो पाहण्याची इच्छा व मनातील आकांक्षा ह्या प्रवासामुळे तो पूर्ण करीत असतो. व आलेल्या अनुभवाव्दारेच तो आपले अनुभवविश्व कलात्मकदृष्ट्या पुस्तकात बंदिस्त करून कलानिर्मिती करीत असतो.

आय. ए. रिचर्डस् हा इंग्लंडमधील टीकाकार त्याचे 'फौंडेशन्स ऑफ एस्थेटिक्स' व 'प्रिन्सिपल्स ऑफ क्रिटिसिझम' या ग्रंथामध्ये साहित्य निर्मितीची प्रक्रिया, साहित्याचा रसिक मनावर होणारा परिणाम, सत्य व सौंदर्य या संकल्पनांचा खरा अर्थ इत्यादी अनेक मुलभूत गोष्टींचे विवेचन केले आहे.

''रिचर्डसच्या मते चांगल्या साहित्यकृती वाचताना माणसाच्या सहजप्रवृत्ती नियंत्रित न होता त्या उत्तेजित होतात व तसे होणे स्वाभाविक आणि इष्ट असेच म्हटले पाहिजे. साहित्याच्या परिशीलनामुळे विरोधी वाटणाऱ्या प्रवृत्तींचे आंदोलनातून (उदा. भय आणि अनुकंपा) एकतानता (Harmony) निर्माण होते. भावनांचा संतुलित आविष्कार हीच श्रेष्ठ वाङ्.मयाची फलश्रृती होय.''

सौ. उषा पाणंदीकरांच्या लेखनीने हेच साधण्याचा प्रयत्न केला आहे. बेनदेत्तो क्रोचे हा इटालियन लेखक ''कलाकाराच्या चेतन व अचेतन मनावर वेळोवेळी जे संस्कार होतात त्याचे मंथन विशिष्ट काळी (म्हणजे स्फूर्तीच्या क्षणी) विशिष्ट कारणांमुळे होत असते व अशा आंतरिक कल्लोळातून कलावंताच्या अंतर्मनामध्ये कलाकृती अवतरत असते. अंत:प्रेरणेने कलावंताला झालेले सहज ज्ञान त्याच्या इंद्रिय ज्ञानापेक्षा भिन्न प्रकारचे असल्याने त्याला सामान्य प्रकारचे वास्तवाचे निकष लावता येत नाही. कलानिर्मितीत कलावंताच्या मनोव्यापारालाच खरे महत्त्व असते. तिला आपण कलाकृती मानतो व जिचे मुल्यमापन करण्यास लोक प्रवृत्त होतात ती मूर्त कला म्हणजे कलावंताच्या मनातील अमूर्त कलेची केवळ छायाच होय. या अमूर्त कलेला मूर्त किंवा प्रकट रूप देताना कलावंतापुढे अनेक अडचणी उभ्या राहतात आणि त्याला अनेक तडजोडीही कराव्या लागतात. खरे म्हणजे कलावंताच्या मनातील कलाकृतीचे स्वरूप काय असेल त्याची काहीशी कल्पना देणे एवढेच कार्य मूर्त किंवा प्रकट कला करू शकते म्हणजेच तिला आपण कलाकृती म्हणून ओळखतो तीही कलावंताच्या अंतरंगातील अमूर्त कलेकडे जाण्याचे एक साधनच ठरते.''

उषा पाणंदीकरांची दोन्ही प्रवासवर्णने त्यांच्या विशेष गुणामुळे वाचनीय झाली आहेत व त्यांना साहित्यिकतेचा दर्जा प्राप्त झाला आहे हे गुण म्हणजे त्यांचे प्रतिभावान मन, पारदर्शकता, आत्मनिवेदन, वास्तवचित्रण, भाष्यात्मकता, सुक्ष्मनिरीक्षणक्षमता, आत्मपरीक्षण, प्रगल्भता, बहुश्रृतव्यक्तीत्व, काव्यमयता, समाजशिक्षक, तटस्थपणा, परखडपणा, टीकात्मलेखन ह्या सर्वांच्या बरोबरच अफाट अशा अवांतर वाचनाची बैठक यामुळे ही दोन्ही प्रवासवर्णने साहित्यक्षेत्रात मौलिक योगदान देणारी ठरली आहेत.